२९ मे, २०२६

दैनिक धर्मवीर
॥ हिंदुत्वाची धगधगती मशाल ॥
सत्य | निर्भीड | निष्ठावंत | राष्ट्रप्रथम

महाराष्ट्र मुख्य

Top Advertisement

संपादकीय

# पेंग्विन बाबा व त्यांच्या पूज्य पिताश्रींनी २५ वर्षे मराठी माणसाचे रक्त पिऊन मुंबईला कुपोषित केले!

**मुंबईच्या राजकीय इतिहासामध्ये सध्या अत्यंत टोकाचा आणि अभूतपूर्व असा संघर्ष पाहायला मिळत आहे. मुंबई महानगरपालिकेवर (BMC) तब्बल अडीच दशके एकछत्री अंमल गाजवणाऱ्या ठाकरे परिवारावर आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि गंभीर आरोप केला जात आहे. "पेंग्विन बाबा आणि त्यांच्या पूज्य पिताश्रींनी २५ वर्षे मराठी माणसाचे रक्त पिऊन मुंबईला कुपोषित केले," हा आरोप केवळ राजकीय चिखलफेक नाही, तर मुंबईकरांच्या मनात धुमसणाऱ्या असंतोषाचा स्फोट आहे.**

छायाचित्र / प्रतिनिधी

१. 'रक्ताचा बाजार' विरुद्ध 'रक्ताचे नाते'; उपमुख्यमंत्र्यांचे देशकार्य!सध्या स्वतःवरील डाग पुसण्यासाठी आणि जनतेची सहानुभूती मिळवण्यासाठी पेंग्विन बाबा आणि त्यांचा गट 'एकनाथ शिंदे यांच्या सेनेवर' "रक्ताचा बाजार मांडल्याचा" पलटवार करत आहेत. यावर सर्वसामान्य मुंबईकरांचा एकच रोखठोक प्रश्न आहे –"आज शिंदेंवर आरोप करणाऱ्यांनो, तुम्ही २५ वर्षे मुंबईत मराठी माणसाचे जे रक्त शोषले, त्याचे काय?"एकीकडे ठाकरे गटाने २५ वर्षे केवळ शोषण केले, तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे गेली कित्येक वर्षे महाराष्ट्रातील लाखो लोकांना अविरत वैद्यकीय सेवा आणि मदत पुरवत आहेत

2. राज्यभरात महाआरोग्य शिबिरे आणि विक्रमी रक्तदान मोहिमा राबवून लाखो रुग्णांचे प्राण वाचवले आहेत.एवढेच नव्हे, तर देशाच्या रक्षणासाठी सीमेवर लढणाऱ्या आपल्या भारतीय सैनिकांना रक्ताची कमतरता भासू नये म्हणून, डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्या संकल्पनेतून आणि एकनाथ शिंदे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली जम्मू-काश्मीरच्या श्रीनगरमधील मिलिटरी बेस हॉस्पिटलमध्ये जाऊन सांगलीच्या तब्बल १,००० पैलवानांनी आणि तरुणांनी 'सिंदूर महारक्तदान' करत इतिहास रचला. स्वतः एकनाथ शिंदेंनी तिथे जाऊन सैनिकांसाठी रक्तदान केले. स्वतःचे खिसे भरण्यासाठी जनतेचे रक्त शोषणाऱ्या पेंग्विन सेना आणि थेट देशाच्या सैनिकांसाठी रक्ताचे पाणी करणाऱ्या शिंदे सेनेमध्ये हाच मुख्य फरक आहे.

3. महानगरपालिकेत बिगर-मराठी कंत्राटदार; एकतरी मराठी दाखवा!मराठी माणसाच्या नावाने मते मागणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी पालिकेतील रस्ते, नालेसफाई, कचरा व्यवस्थापन आणि इतर सर्व मोठी अब्जावधी रुपयांची कंत्राटे ठराविक बिगर-मराठी आणि परप्रांतीय कंत्राटदारांच्या झोळीत टाकली. "महानगरपालिकेत मोठी कंत्राटे मिळालेला एकतरी मराठी कंत्राटदार दाखवा," असे उघडे आव्हान आता दिले जात आहे. मराठी तरुणांना आणि स्थानिक व्यावसायिकांना डावलून केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी परप्रांतीय लॉबी पोसण्याचे काम पालिकेत झाले.4. मराठी माणसाची मुंबईतून हकालपट्टीज्या मराठी माणसाच्या जिवावर आणि मतांवर अडीच असा मोठा काळ सत्ता उपभोगली, त्याच मराठी माणसाला आज मुंबईत हक्काचे घर परवडत नाही. मराठी माणूस मुंबईतून हद्दपार होऊन ठाणे, कल्याण, डोंबिवली, भाईंदर आणि विरारसारख्या दूरच्या उपनगरांमध्ये फेकला गेला आहे. गिरणगावाचा आणि मराठी संस्कृतीचा कणा असलेली मुंबई आज मराठी माणसासाठीच परकी झाली आहे, हीच खरी मुंबईची शोकांतिका आहे.

५. शासकीय जमिनी बिल्डरांच्या घशात आणि बिल्डरधार्जिणे राजकारणमुंबईच्या मोक्याच्या जागा, शासकीय जमिनी आणि मोकळी मैदाने सर्वसामान्य मुंबईकरांच्या हितासाठी वापरण्याऐवजी, स्वतःच्या मर्जीतील बड्या विकासकांच्या (Builders) घशात घातल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. मुंबईच्या विकासाचे नियोजन हे सर्वसामान्यांना केंद्रस्थानी ठेवून नाही, तर बिल्डरांचा आर्थिक फायदा कसा होईल, हे पाहूनच केले गेले. आशियातील सर्वात श्रीमंत अशी ओळख असलेल्या मुंबई महानगरपालिकेची तिजोरी सर्वसामान्यांसाठी नव्हे, तर बिल्डर लॉबीच्या इशाऱ्यावर चालवली गेली.

6. विकासाचे कुपोषण आणि कोविड काळातील संतापदरवर्षी पावसाळ्यात मुंबई तुंबते, रस्ते खड्ड्यांत जातात आणि आरोग्य व्यवस्था कोलमडते. अब्जावधी रुपयांचे बजेट असूनही मुंबईचा विकास 'कुपोषित' का राहिला, याचे उत्तर २५ वर्षे सत्ता भोगणाऱ्यांनी दिले पाहिजे. ज्या काळात मुंबईकर मृत्यूशी झुंजत होते, त्या संकटकाळातही 'खिचडी घोटाळा' आणि 'बॉडी बॅग घोटाळा' करून मराठी जनतेच्या टाळूवरचे लोणी खाल्ल्याचा आरोप केला जातो.

**१. 'रक्ताचा बाजार' विरुद्ध 'रक्ताचे नाते'; उपमुख्यमंत्र्यांचे देशकार्य!सध्या स्वतःवरील डाग पुसण्यासाठी आणि जनतेची सहानुभूती मिळवण्यासाठी पेंग्विन बाबा आणि त्यांचा गट 'एकनाथ शिंदे यांच्या सेनेवर' "रक्ताचा बाजार मांडल्याचा" पलटवार करत आहेत. यावर सर्वसामान्य मुंबईकरांचा एकच रोखठोक प्रश्न**